# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला
ई-मेल: directorcrs78@gmail.com, directorcrs@pdkv.ac.in


जा.क्र.मसंकें/विकास/2501/२०२६ दि. 18/03/२०२६

## लिलावाची नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत **पश्चिम व महामार्ग** विभागाच्या प्रक्षेत्रावरील **आंबा** फळबहाराचा जाहीर लिलाव दि. २७.०३.२०२६ रोजी स. ११.३० वा. करण्याचा ठरविण्यात आला आहे. सदर **आंबा** फळ बहाराचा जाहीर लिलाव मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत **सामान्य विभाग** कार्यालय येथे करण्यात येणार आहे.

तरी इच्छुक व्यापाऱ्यांनी विभागावरील फळझाडांची लिलावाचे पूर्वी पाहणी करून **बंद लिफाफामध्ये लिलाव (बोली) रक्कम दि. २३.०३.२०२६ ते २७.०३.२०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यंत संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला कार्यालयामध्ये जमा करावे** व लगेच सर्व लिलावधारकांच्या समक्ष दि. २७.०३.२०२६ रोजी स. ११.३० वा. लिलाव बोलीचे बंद लिफाफे उघडण्यात येतील व विभागानुसार सर्वात जास्त लिलाव (बोली) रक्कम असेल त्या लिलावधारकास विभागावरील फळ झाडे दिल्या जातील. करिता इच्छुकांनी सदर लिलावामध्ये भाग घेण्याकरिता स्वखर्चाने अटी व शर्तीचे अधीन राहून जास्तीत जास्त संख्येने हजर रहावे.

**आंबा** फळ बहाराचे विवरण व बंद लिफाफ्यामध्ये भरावयाचा नमुना खालील प्रमाणे आहे.

| अ क्र. | विभागाचे नाव | एकूण झाडे | फळ धारणा झालेली झाडे | लिलाव (बोली) रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | पश्चिम | ४०० | २३० | |
| २ | महामार्ग | २८७ | १५३ | |

लिलावाच्या अटी व शर्ती मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत सामान्य विभागाचे तसेच संबंधित विभागाच्या सूचना फलकावर लावण्यात आलेले आहे.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पंदेकृवि, अकोला

## जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत **पश्चिम व महामार्ग** विभागावरील परिसरातील **आंबा** फळबहाराचा जाहीर लिलाव दिनांक २७.०३.२०२६ रोजी स. **११.३०** वाजता **सामान्य विभाग** कार्यालय येथे करण्यात येत आहे. त्या लिलावाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

- **पश्चिम व महामार्ग** विभागावरील फक्त **आंबा** फळबहराचा जाहीर लिलावात समावेश आहे.
- इच्छुक व्यापाऱ्यांनी विभागावरील फळझाडांची लिलावाचे पूर्वी पाहणी करून **बंद लिफाफामध्ये लिलाव (बोली) रक्कम दि. २३.०३.२०२६ ते २७.०३.२०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यंत संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला कार्यालयामध्ये जमा करावे.**
- ज्यांना लिलावामध्ये भाग घ्यावयाचा असेल त्यांना रुपये **रु.** २००० अनामत रक्कम म्हणून नगदी भरावे लागतील.
- ज्या व्यक्तींनी **रु.** २००० अनामत रक्कम भरली असेल त्यांना फक्त लिलावाच्या वेळी प्रक्षेत्रावरील ठिकाणी हजर राहता येईल व त्यांचेच लिलाव (बोली) रक्कमचे बंद लिफाफे उघडण्यात येतील. लिलाव **अनामत रक्कम भरलेल्या** व्यक्तींव्यतरिक्त कोणत्याही व्यक्तीस लिलावा दरम्यान लिलाव स्थळी थांबता येणार नाही. पहिल्या दोन जास्तीत जास्त लिलावबोली धारकांचे व्यतिरिक्त इतर व्यक्तींची अनामत रक्कम लगेच परत करण्यात येईल व प्रथम लिलावधारकाने ७ दिवसाचे आत संपूर्ण लिलाव रक्कम जमा केल्यास नं. २ लिलावधारकास अनामत रक्कम परत करण्यात येईल
- फळबहाराची अपेक्षित किंमत आल्याशिवाय लिलावाच्या बोली मान्य करणे अथवा नाकारणे हे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील. बोली बोलणाऱ्या पैकी ज्या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली असेल त्याला लिलाव समिती मान्यता देईल व ह्याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला यांनी राखून ठेवलेला आहे.
- लिलावधारकास अंतिम बोलीच्या म्हणजेच लिलाव रक्कमेच्या **१० % रक्कम सुरक्षा ठेव** म्हणून **लिलावाचे दिवशीच जमा** करावी लागेल. सदर सुरक्षा ठेव रक्कम लिलावाच्या अंतिम मुदतीनंतर परत करण्यात येईल.
- लिलावधारकास लिलावाची **१०० टक्के** किंवा **५० % रक्कम लिलाव झाल्यापासून तीन दिवसाचे आत** रोखीने संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांचेकडे भरावी लागेल व उर्वरित **५० % रक्कम लिलाव झाल्यापासून ७ दिवसाचे आत** रोखीने संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांचेकडे जमा करावी लागेल. उर्वरित लिलाव रक्कम लिलाव झाल्यापासून **७ दिवसाच्या आत जमा न केल्यास** लिलावधारकाने कार्यालयात जमा केलेली रक्कम कुठल्याही परिस्थितीत परत करण्यात येणार नाही व लिलाव हा नं. २ लिलावधारकास देण्याकरिता शिफारस करण्यात येईल. नं. २ लिलावधारकास **त्वरित लिलाव रक्कम जमा** करावी लागेल किंवा **त्वरित १० % सुरक्षा ठेव रक्कम भरणा करून ७ दिवसाचे आत लिलाव रक्कम जमा** करावी लागेल व ७ दिवसाचे आत लिलाव रक्कम भरणा न केल्यास जमा केलेली सुरक्षा ठेव रक्कम नं. २ लिलावधारकास कुठल्याही परिस्थितीत परत करण्यात येणार नाही आणि लिलाव रद्द करण्यात येईल. यानंतर नव्याने लिलाव प्रक्रिया राबविण्यात येईल.
- ठरलेल्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी व ठरलेल्या वेळेवर बंद लिफाफे सादर केलेले व्यापारी हजर नसल्यास किंवा तीन पेक्षा कमी बंद लिफाफे असल्यास लिलाव रद्द करण्याचा अधिकार लिलाव समिती घेईल.
- प्रयोगाकरिता संबंधित विभागास किमान ५० किलो फळे विनामुल्य द्यावी लागतील.
- लिलावधारक व प्रक्षेत्रावरील अधिकारी यांच्या मध्ये काही कारणास्तव वादविवाद निर्माण झाल्यास मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र ह्यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.
- लिलाव दिल्यानंतर नैसर्गिक आपत्ती मुळे नुकसान झाल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही तसेच उर्वरित लिलाव रक्कमे मध्ये कुठल्याही प्रकारची सुट दिल्या जाणार नाही **मंजूर झालेली अंतिम बोलीची पूर्ण रक्कम ठरलेल्या वेळेत भरणा करावी लागेल.**

- लिलाव झालेल्या फळबागेमधील फळे नेणाऱ्या व्यक्तीची यादी आधार अथवा ओळखपत्रासह संबंधित प्रभारी अधिकारी यांचेकडे जमा करावी लागेल व तीच व्यक्ती फळे तोडून नेऊ शकेल. सदर व्यक्तीला विभागातून पास दिल्या जाईल व एकावेळी जास्तीत जास्त तीन व्यक्तींची पास दिल्या जाईल.
- झाडावरील फळे तोडताना झाडांना हानी पोहोचणार नाही याची दक्षता लिलावधारकास घ्यावी लागेल. बागेतील झाडाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई लिलावधारकाकडून करण्यात येईल व ह्या बाबतचा अंतिम निर्णय संचालक , मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला यांचा राहील.
- फळे तोडून नेण्याची अंतिम तारीख ..................................राहील.
- लिलावधारकास विभागावरील फळ बागेतील रखवाली करिता ठेवणाऱ्या व्यक्तीची माहिती आधार अथवा ओळखपत्रासह प्रभारी अधिकारी **पश्चिम व महामार्ग विभाग** यांना द्यावी लागेल व त्यांचेकडून त्यांना गेटपास देण्यात येईल. प्रक्षेत्रावर फक्त गेटपास धारकांनाच प्रवेश राहील.
- झाडांची रखवाली लिलावधारकास स्वतः करावी लागेल. राखणदारी करतेवेळी विद्यापीठातील मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच नुकसान झाल्यास लिलावाची रक्कम जप्त करून झालेली नुकसान भरपाई लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल. तसेच लिलावधारकास फळबागेमध्ये फक्त तात्पुरते रखवाली मचान स्वखर्चाने करावे लागेल, फळे तोडून नेण्याचे अंतिम तारीखेपर्यंत झोपडी किंवा घर करून कायम वास्तव्याची व्यवस्था करता येणार नाही.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पंदेकृवि, अकोला